जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

16 MAR 2023 पुढारी

# राजर्षी शाहू महाराजांमुळे लोककल्याणकारी राज्याची स्थापना

## डॉ. भालचंद्र मुणगेकर; राजर्षी शाहू स्मृतिशताब्दी परिषदेचे उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने लोककल्याणकारी राज्यव्यवस्थेची प्रस्थापना करणारे राजा म्हणजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत खा. डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग आणि राजर्षी शाहू संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोनदिवसीय राजर्षी शाहू स्मृतिशताब्दी परिषदेच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून शाहू महाराज होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते.

डॉ. मुणगेकर म्हणाले, शाहू महाराजांनी सर्व समाजघटकांचा साकल्याने विचार केला. सामाजिक समावेशनाची प्रक्रिया जेव्हा चर्चाविश्वातही नव्हती, त्या काळात वंचित, शोषित घटकांच्या समावेशी वृद्धीचा त्यांनी कृतिशील विचार केला. राजकीय अर्थकारणाच्या आधारेच लोककल्याणाची अनेकविध कामे मार्गी लावली. त्यातून शेतकरी, कष्टकरी, शोषित, वंचित, दलित अशा समग्र घटकांना सामाजिक न्याय प्रदान केला. भांडवलशाहीतील आर्थिक केंद्रीकरणाला विरोध करणारे त्या काळातील देशामधील एकमेव संस्थानिक म्हणजे शाहू महाराज होते. त्यांचा भर विकेंद्रीकरणावर होता. १९१७ साली त्यांनी मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा करून मानवी विकासासाठी ते आग्रही असल्याचे दिसते. शाहू महाराज म्हणाले, पुरोगामी विचारांवर हल्ले होत असताना त्यांचा आक्रमक विचारांनी प्रतिरोध केला जाणे गरजेचे आहे. क्रांती आणि प्रतिक्रांतीचे चक्र पूर्ण होऊन नव्याने पुरोगामी विचारपरंपरा प्रस्थापित होणे आवश्यक आहे. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी, मानवी भांडवलामध्ये गुंतवणूक करण्याचा एक महत्त्वाचा धडा शाहू महाराजांनी आपल्याला दिला आहे. त्या मार्गावरून चालण्याची नितांत आवश्यकता आहे, असे सांगितले. प्रास्ताविक डॉ. जयसिंगराव पवार यांनी केले. सुश्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. अवनीश पाटील यांनी आभार मानले.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात राजर्षी शाहू स्मृतिशताब्दी परिषदेत बीजभाषण करताना डॉ. भालचंद्र मुणगेकर. शेजारी डॉ. जयसिंगराव पवार, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, शाहू महाराज, डॉ. अवनीश पाटील.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
सकाळ
16 MAR 2023

# राजर्षींकडून सर्वंकष मानवी विकासाचा विचार

## भालचंद्र मुणगेकर; शिवाजी विद्यापीठात स्मृतिशताब्दी परिषदेचा प्रारंभ



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात बुधवारी राजर्षी शाहू स्मृतिशताब्दी परिषदेत ज्येष्ठ विचारवंत डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी बीजभाषण केले. या वेळी डावीकडून डॉ. जयसिंगराव पवार, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, श्रीमंत शाहू छत्रपती महाराज, डॉ. अवनीश पाटील उपस्थित होते.**

**कोल्हापूर, ता. १५ :** ''महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने लोककल्याणकारी राज्यव्यवस्थेची प्रस्थापना करणारे राजा म्हणजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज होते. मानवी भांडवलात गुंतवणूक केल्याखेरीज तरणोपाय नाही, हे त्यांना समजले होते. म्हणूनच १९१७ मध्ये त्यांनी मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा केला. त्यांच्या कारकीर्दीत मानवी भांडवलात गुंतवणुकीची अशी अनेक उदाहरणे दिसतील. त्यामुळे सर्वंकष मानवी विकासासाठी ते आग्रही असल्याचे दिसते,'' असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत खासदार डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग आणि राजर्षी शाहू संशोधन केंद्रातर्फे आयोजित दोन दिवसीय राजर्षी शाहू स्मृती शताब्दी परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी बीजभाषणात ते बोलत होते. मानव्यविद्या सभागृहातील या कार्यक्रमास श्रीमंत शाहू छत्रपती महाराज प्रमुख उपस्थित होते. कुलगुरू डॉ.दिगंबर शिर्के अध्यक्षस्थानी होते.

'राजर्षी शाहूंचे अर्थकारण आणि त्याची विद्यमान प्रासंगिकता' या विषयाच्या अनुषंगाने डॉ. मुणगेकर यांनी मांडणी केली. ते म्हणाले, ''राजर्षी शाहूंनी राजकीय अर्थकारणाच्या आधारेच लोककल्याणाची अनेकविध कामे मार्गी लावली. त्यातून शेतकरी, कष्टकरी, शोषित, वंचित, दलित अशा समग्र घटकांना सामाजिक न्याय प्रदान केला. भांडवलशाहीतील आर्थिक केंद्रीकरणाला विरोध करणारे त्या काळातील देशामधील एकमेव संस्थानिक म्हणजे शाहू महाराज होत. त्यांचा भर विकेंद्रीकरणावर होता.''

श्रीमंत शाहू छत्रपती महाराज म्हणाले, ''पुरोगामी विचारांवर हल्ले होत असताना त्यांचा आक्रमक विचारांनी प्रतिरोध केला जाणे गरजेचे आहे. क्रांती आणि प्रतिक्रांतीचे चक्र पूर्ण होऊन नव्याने पुरोगामी विचारपरंपरा प्रस्थापित होणे आवश्यक आहे.''

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, ''मानवी भांडवलामध्ये गुंतवणूक करण्याचा एक महत्त्वाचा धडा राजर्षी शाहूंनी आपल्याला दिला. त्या मार्गावरुन चालण्याची नितांत आवश्यकता आहे. त्यामध्ये शिक्षण, आरोग्य सुविधा आदी बाबींचा समावेश असायला हवा.''

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी प्रास्ताविक केले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. अवनीश पाटील यांनी आभार मानले.

### ऋण मानत नसल्याचा मोठा पेच

'आज अनेक जण फुले, शाहू, आंबेडकरांचे ऋण मानत नाहीत, हा एक मोठाच पेच आहे. हा पेच सोडविण्याचे आव्हान आपल्यासमोर आहे. आज आपण खूप सुरक्षित राहू लागलो आहोत. धोका पत्करल्याखेरीज कोणतेही सामाजिक प्रबोधन करता येणार नाही', असे डॉ. मुणगेकर म्हणाले

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 MAR 2023

तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठात शाहूंचे दर्शन!

## शाहू स्मृती शताब्दी परिषदेचे उद्घाटन : पहिल्या दिवशी डॉ. भालचंद्र मुणगेकर, डॉ. यशवंत थोरात, डॉ. तारा भवाळकर यांनी उलघडले शाहूविचारांचे पैलू

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

बहुजन उद्धारक, लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांच्या स्मृती शताब्दीचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग आणि राजर्षी शाहू संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय राजर्षी शाहू स्मृती शताब्दी परिषदेचे बुधवारी उद्घाटन झाले. मानव्यशास्त्र विभागाच्या सभागृहात डॉ. भालचंद्र मुणगेकर, नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ. यशवंत थोरात आणि ज्येष्ठ विचारवंत डॉ. तारा भवाळकर यांनी शाहूंच्या विचारांतील विविध पैलू उलघडवून दाखवित त्यांच्या कार्याची महती सांगितली. उद्घाटनप्रसंगी उद्घाटक व प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमंत शाहू छत्रपती उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. भारती पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

**शाहू महाराजांमुळेच महाराष्ट्रात लोककल्याणकारी राज्याची स्थापना : डॉ. भालचंद्र मुणगेकर**

महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने लोककल्याणकारी राज्यव्यवस्थेची प्रस्थापना करणारे राजा म्हणजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत खासदार डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी केले. 'राजर्षी शाहूंचे अर्थकारण आणि त्याची विद्यमान प्रासंगिकता' या विषयाच्या अनुषंगाने बीजभाषण करताना डॉ. मुणगेकर म्हणाले, शाहू महाराजांनी सर्व समाजघटकांचा साकल्याने विचार केला. सामाजिक समावेशनाची प्रक्रिया जेव्हा चर्चाविश्वातही नव्हती, त्या काळात वंचित, शोषित घटकांच्या समावेशी वृद्धीचा त्यांनी कृतीशील विचार केला. मिळकतीच्या स्रोतांचे व्यवस्थापन आणि प्राप्त मिळकतीचे समान आणि एकाच वेळी वाटप, याचा विचार म्हणजे राजकीय अर्थकारण. झिरपणीच्या सिद्धांतास शाहू महाराज नक्कीच अनुकूल नव्हते. त्यांनी राजकीय अर्थकारणाच्या आधारेच लोककल्याणाची अनेकविध कामे मार्गी लावली. त्यातून शेतकरी, कष्टकरी, शोषित, वंचित, दलित अशा समग्र घटकांना सामाजिक न्याय प्रदान केला. भांडवलशाहीतील आर्थिक केंद्रीकरणाला विरोध करणारे त्या काळातील देशामधील एकमेव संस्थानिक म्हणजे शाहू महाराज होते. नऊ लाख लोकसंख्येच्या संस्थानामध्ये भांडवलशाहीला त्यांनी विरोध केलाच, पण सर्व प्रकारच्या मर्यादा तोडून महाराजांनी त्यांचे कार्य उभारले. मान्यवरांच्या हस्ते शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन केले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. अवनीश पाटील यांनी आभार मानले.




कोल्हापूर : राजर्षी शाहू स्मृती शताब्दी परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी बीजभाषण करताना डॉ. भालचंद्र मुणगेकर. सोबत डॉ. जयसिंगराव पवार, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, श्रीमंत शाहू छत्रपती, डॉ. अवनीश पाटील.

**आज परिषदेची सांगता**

गुरुवारी, १६ रोजी सकाळी साडेअकरा वाजता राजर्षी शाहू आणि महाराष्ट्रातील प्रबोधन परंपरा यावर डॉ. सदानंद मोरे यांचे तर राजर्षी शाहू आणि सामाजिक न्याय यावर प्राचार्य आनंद मेणसे यांचे व्याख्यान होणार आहे. दुपारी ३ वाजता निवृत्त जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख हे 'राजर्षी शाहू आणि भारतीय संविधान' यावर मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी शाहू संशोधन केंद्राचे संचालक जयसिंगराव पवार आहेत. या कार्यक्रमाने परिषदेची सांगता होणार आहे.

## शाहू महाराजांच्या जडणघडणीत गुरू फ्रेझर यांचा मोलाचा वाटा : डॉ. यशवंत थोरात

राजर्षी शाहू महाराजांच्या जडणघडणीत त्यांचे गुरू सर स्टुअर्ट फ्रेझर यांचा महत्त्वाचा वाटा आहे, असे मत ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ व विचारवंत डॉ. यशवंतराव थोरात यांनी येथे व्यक्त केले. 'राजर्षी शाहू आणि युरोपियन विचारविश्व' या विषयावर डॉ. थोरात बोलत होते. ते म्हणाले, विसाव्या वर्षी भारतीय लोकसेवा परीक्षा उत्तीर्ण होऊन बॉम्बे प्रेसिडेन्सीमध्ये रुजू झालेल्या फ्रेझर यांच्यावर राजकुमारांच्या ट्युटरशीपची जबाबदारी सोपविली. एकीकडे युरोपातील मुक्त विचारांचे वारे तर दुसरीकडे वसाहतवादी भूमिकेतून भारतामध्ये करावयाचा वावर अशा दुहेरी भूमिकेतून फ्रेझर यांच्यासह आयसीएसमधील सर्वच अधिकाऱ्यांना काम करावे लागत असे. फ्रेझर यांनी तेरा वर्षांमध्ये अवघ्या तीन राजकुमारांना शिकविले. त्यामध्ये शाहू महाराजांसह भावनगरचे भावसिंगजी महाराज आणि म्हैसूरचे कृष्णराज वाडियार यांचा समावेश होता. या तिन्ही राजकुमारांनी आपल्या संस्थानात सर्व क्षेत्रात केलेले कार्य आजच्या राजकर्त्यांना प्रेरणा देणारी आहेत. डॉ. नंदकुमार मोरे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला व आभार मानले.



## राजर्षी शाहूंच्या कृतिशिलतेमुळे महिलांना न्याय : डॉ. तारा भवाळकर

महात्मा जोतिबा फुले यांनी महिलांच्या शिक्षणासाठी वैचारिक मशागत केली, पण राजर्षी शाहूराजांनी यात आपल्या दूरदृष्टीतून कृतिशील भर घातली. त्यांनी केलेले सक्तीचे प्राथमिक शिक्षण, कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदेच हिंदू कोड बिलातून पुढे आले. याशिवाय ८६ वर्षांनंतर सरकारने कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा करून राजर्षी शाहूराजांच्या कृतिशीलतेचा गौरवच केला आहे, असे गौरवोद्गार ज्येष्ठ साहित्यिक, डॉ. तारा भवाळकर यांनी केले.

डॉ. भवाळकर यांनी 'राजर्षी शाहू आणि त्यांची स्त्रीविषयक भविष्यवेधी दृष्टी' यावर विचार मांडले. अध्यक्षस्थानी डॉ. जयसिंगराव पवार होते. डॉ. भारती पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. भवाळकर म्हणाल्या, राजर्षी शाहूराजांकडे माणसाला समर्थ करण्याची दूरदृष्टी होती. राजर्षी शाहू दत्तक आल्यानंतर त्यांच्या कुटुंबातील चार महिलांमध्ये त्यांची वैचारिक जडणघडण झाली. त्यांची स्त्रीविषयक भविष्यवेधी दृष्टी तयार झाली. त्यांनी संस्थानात सक्तीचे शिक्षण राबवले. विविध जातीच्या विद्यार्थ्यांसाठी शाळा काढल्या, वसतीगृहे काढली, अन् जातीनिर्मूलनासाठी पावले उचलली.



जनसंपर्क कक्ष
16 MAR 2023 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाहू महाराजांच्या जडणघडणीत फ्रेझर यांचा वाटा

## डॉ. यशवंतराव थोरात, राजर्षी शाहू स्मृती शताब्दी परिषद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राजर्षी शाहू महाराजांच्या जडणघडणीत त्यांचे गुरू सर स्टुअर्ट फ्रेझर यांचा महत्त्वाचा वाटा आहे, असे मत ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ व विचारवंत डॉ. यशवंतराव थोरात यांनी केले. शिवाजी विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग आणि राजर्षी शाहू संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या राजर्षी शाहू स्मृती शताब्दी परिषदेच्या पहिल्या सत्रात 'राजर्षी शाहू आणि युरोपियन विचारविश्व' या विषयावर डॉ. थोरात बोलत होते.

डॉ. थोरात म्हणाले, वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी भारतीय लोकसेवा परीक्षा उत्तीर्ण होऊन बॉम्बे प्रेसिडेन्सीमध्ये रुजू झालेल्या फ्रेझर यांच्यावर राजकुमारांच्या ट्युटरशीपची जबाबदारी सोपविण्यात आली. एकीकडे युरोपातील मुक्त विचारांचे वारे तर दुसरीकडे वसाहतवादी भूमिकेतून भारतामध्ये करावयाचा वावर अशा दुहेरी भूमिकेतून फ्रेझर यांच्यासह आयसीएसमधील सर्वच अधिकाऱ्यांना काम करावे लागत असे. फ्रेझर यांनी तेरा वर्षांमध्ये अवघ्या तीन राजकुमारांना शिकविले. त्यामध्ये शाहू महाराजांसह भावनगरचे भावसिंगजी महाराज आणि म्हैसूरचे कृष्णराज वाडियार यांचा समावेश होता. शाहू महाराजांवर त्यांच्या शिकवणीचा खूप मोठा प्रभाव पडला.

यावेळी डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले.

पुढारी

# शाहू महाराजांच्या जडणघडणीत फ्रेझर यांचे योगदान मोलाचे : डॉ. थोरात



**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राजर्षी शाहू महाराजांच्या जडणघडणीत त्यांचे गुरू सर स्टुअर्ट फ्रेझर यांचा महत्त्वाचा वाटा आहे, असे मत ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ व विचारवंत डॉ. यशवंतराव थोरात यांनी येथे व्यक्त केले. राजर्षी शाहू स्मृती शताब्दी परिषदेच्या पहिल्या सत्रात 'राजर्षी शाहू आणि युरोपियन विचारविश्व' या विषयावर ते बोलत होते.


डॉ. थोरात म्हणाले, वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी भारतीय लोकसेवा परीक्षा उत्तीर्ण होऊन बॉम्बे प्रेसिडेन्सीमध्ये रुजू झालेल्या फ्रेझर यांच्यावर शाहू महाराज यांच्या ट्युटरशीपची जबाबदारी सोपविण्यात आली. एकीकडे युरोपातील मुक्त विचारांचे वारे तर दुसरीकडे वसाहतवादी भूमिकेतून भारतामध्ये करावयाचा वावर अशा दुहेरी भूमिकेतून फ्रेझर यांच्यासह आयसीएसमधील सर्वच अधिकाऱ्यांना काम करावी लागत असे. फ्रेझर यांनी तेरा वर्षांमध्ये अवघ्या तीन राजकुमारांना शिकविले. त्यामध्ये शाहू महाराजांसह भावनगरचे भावसिंगजी महाराज आणि म्हैसूरचे कृष्णराज वाडियार यांचा समावेश होता.

यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, ज्येष्ठ विचारवंत डॉ. भालचंद्र मुणगेकर, नंदकुमार मोरे, अवनिश पाटील आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
16 MAR 2023 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यशवंतराव थोरात यांना ऐकून कोल्हापूर भेट सार्थकी लागली

## मुणगेकर; शिवाजी विद्यापीठातील व्याख्यानाप्रसंगी मानवंदना



डॉ. यशवंतराव थोरात

**कोल्हापूर, ता. १५ :** शिवाजी विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग आणि राजर्षी शाहू संशोधन केंद्रातर्फे आयोजित राजर्षी शाहू स्मृतिशताब्दी परिषदेच्या पहिल्या सत्रात 'राजर्षी शाहू आणि युरोपियन विचारविश्‍व' या विषयावर 'नाबार्ड'चे माजी अध्यक्ष डॉ. यशवंतराव थोरात यांनी आज मांडणी केली. त्यांचे व्याख्यान झाल्यावर व्यासपीठावर जाऊन ज्येष्ठ विचारवंत डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी 'डॉ. थोरात यांना ऐकल्यानंतर माझी कोल्हापूर भेट सार्थकी लागली,' अशा शब्दांत भावना व्यक्त केल्या.

डॉ. थोरात यांनी या व्याख्यानात एकेक मुद्दा ठेवत त्याच्या शक्याशक्यतांची सर्वंकष चर्चा करीत मांडणी केली. ती इतकी प्रभावी ठरली की, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्यासह मानव्यशास्त्र सभागृहात उपस्थित मान्यवरांनी व्याख्यान संपल्यानंतर उभे राहून त्यांना मानवंदना दिली. दरम्यान, या व्याख्यानात राजर्षी शाहू महाराजांच्या जडणघडणीत त्यांचे गुरू सर स्टुअर्ट फ्रेझर यांचा महत्त्वाचा वाटा आहे. फ्रेझर यांनी तेरा वर्षांमध्ये अवघ्या तीन राजकुमारांना शिकविले. त्यामध्ये शाहू महाराजांसह भावनगरचे भावसिंगजी महाराज आणि म्हैसूरचे कृष्णराज वाडियार यांचा समावेश होता, असे डॉ. थोरात यांनी सांगितले. शाहू महाराजांवर त्यांच्या शिकवणीचा खूप मोठा प्रभाव पडला. हे गृहितक सिद्ध करताना त्यांनी भावनगर आणि म्हैसूरच्या राजांनी केलेल्या कामगिरीचा दाखला दिला. शाहू महाराज, भावसिंगजी महाराज आणि कृष्णराज महाराज यांच्या कार्यामागील समप्रेरणा कोण असतील, तर ते म्हणजे त्यांचे गुरू सर स्टुअर्ट फ्रेझर होय, असे सिद्ध करता येऊ शकते. या विषयाच्या अनुषंगाने अधिक संशोधन होण्याची नितांत गरज असल्याचे मत डॉ. थोरात यांनी व्यक्त केले.

लोकमत

# संशोधन क्षेत्र बळकट करणे गरजेचे : जाधव

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भारताने संशोधन आणि नाविन्यपूर्णतेचे नेतृत्व करण्यासाठी संशोधन क्षेत्र अधिक बळकट करणे गरजेचे आहे, असे मत शिवाजी विद्यापीठातील ग्रंथालय आणि महितीशास्त्र विभागातील प्रा. डॉ. युवराज जाधव यांनी व्यक्त केले.

येथील यशवंतराव चव्हाण (केएमसी) महाविद्यालयामध्ये 'संशोधनात्मक प्रबंध लेखन' कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी कॉमर्स कॉलेजचे ग्रंथपाल डॉ. टी. एल. कांबळे आणि न्यू कॉलेजचे ग्रंथपाल डॉ. आर. पी. आडाव यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. अरूण पौडमल होते. यावेळी प्रा. पी. डी. तोरस्कर, ग्रंथपाल डॉ. रवींद्र मांगले, प्रा. अंजली पाटील, डॉ. संजय कांबळे उपस्थित होते.

16 MAR 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# मधुमेही रुग्णांसाठी 'स्टेम सेल' वरदान

## डॉ. आर. आर. भोंडे; शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १५ : मधुमेही रुग्णांसाठी स्टेम सेल्स या वरदान असल्याचे पिंपरी (पुणे) येथील डॉ. डी.वाय. पाटील मेडिकल कॉलेजच्या संशोधन विभागाचे संचालक डॉ. आर. आर. भोंडे यांनी मंगळवारी येथे सांगितले.

शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अधिविभागात डॉ. आप्पासाहेब तानसेन वरूटे स्मृती व्याख्यानमालेअंतर्गत 'इस्लेट्स इंजिनिअरिंग' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील होते. डॉ. भोंडे म्हणाले, 'एकविसाव्या शतकात मधुमेहाची व्याप्ती वाढली आहे. त्या अनुषंगाने उपचार, संशोधन ही काळाची गरज आहे. निरोगी लोकांच्या स्वादुपिंडामधील लँगरहॅन इस्लेट्समधील बिटा पेशी इन्सुलिन हे हॉर्मोन तयार करतात. इन्सुलिनमुळे रक्तातील साखर शरीराच्या पेशींमध्ये सामावण्याची प्रक्रिया होत असते. मधुमेही व्यक्तींमध्ये ही प्रक्रिया मंदावलेली किंवा थांबलेली असते. संशोधनाअंती असे आढळले आहे की, आपल्या शरीरातील चरबी साठवणाऱ्या ॲडिपोज टिशू- स्टेम सेल्सपासून इस्लेट्सची निर्मिती करता येते. याव्यतिरिक्त बोन मॅरो, प्लासेंटा, अंबायलिकल कॉर्ड, एम्निऑटिक मेम्ब्रेन यांच्यापासूनही इस्लेट्सची निर्मिती करता येते. या इस्लेट्सचे मधुमेही उंदरांमधील प्रत्यारोपण यशस्वी झाले असून, त्यामुळे रक्तातील साखर नियंत्रित झाल्याचेही आढळले आहे. या संशोधनामुळे मधुमेह उपचार संशोधनाला नवी दिशा मिळाली आहे.'



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात डॉ. आप्पासाहेब तानसेन वरूटे व्याख्यानमालेत बोलताना डॉ. आर. आर. भोंडे.**

प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी प्राणिशास्त्र विषयातील संशोधनासाठी लागणारी वेगवेगळी उपकरणे, त्यांचा पदार्थविज्ञानाशी असलेला संदर्भ याविषयी माहिती दिली. यावेळी डॉ. एस. आर. यंकंची, एन. ए. कांबळे, ए. डी. गोफणे, वाय. के. माने उपस्थित होते. समन्वयक डॉ. एस. एम. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. अधिविभागप्रमुख डॉ. आशिष देशमुख यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सुलक्षणा साडेकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एम. पी. भिलावे यांनी आभार मानले.

पुण्यनगरी

# मधुमेही रुग्णांसाठी स्टेम सेल्स वरदान : डॉ. आर. आर. भोंडे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मधुमेही रुग्णांसाठी स्टेम सेल्स हे वरदान असल्याचे प्रतिपादन पिंपरी (पुणे) येथील डॉ. डी. वाय. पाटील मेडिकल कॉलेजच्या संशोधन विभागाचे संचालक डॉ. आर. आर. भोंडे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागात डॉ. आप्पासाहेब तानसेन वरुटे स्मृती व्याख्यानमालेअंतर्गत 'इस्लेटस् इंजिनिअरिंग' या विषयावर ते बोलत होते.

डॉ. आर. आर. भोंडे म्हणाले, एकविसाव्या शतकात मधुमेहाची व्याप्ती सर्वत्र वाढली आहे. त्या अनुषंगाने उपचार, संशोधन ही काळाची गरज आहे.

अध्यक्षीय मनोगतात प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी प्राणीशास्त्र विषयातील संशोधनासाठी लागणारी वेगवेगळी उपकरणे, त्यांचा पदार्थ विज्ञानाशी असलेला संदर्भ याविषयी माहिती दिली. या विषयातील संशोधनासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित केले. समन्वयक एस. एम. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. अधिविभागप्रमुख आशीष देशमुख यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी एस. आर. यंकंची, एन. ए. कांबळे, ए. डी. गोफणे, वाय. के. माने आदी उपस्थित होते.

पुढारी

# कल्याणी पाटीलची भारतीय रग्बी संघात निवड

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा



बोर्निओ मलेशिया इथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय रग्बी स्पर्धेसाठीच्या भारतीय वरिष्ठ गट महिला संघात कोल्हापूरच्या कल्याणी कृष्णात पाटील हिची निवड झाली आहे. कोलकाता येथे झालेल्या शिबिरातून ही निवड करण्यात आली. संघाचा सराव दक्षिण आफ्रिकेचे प्रशिक्षक लुध्विक व सहायक प्रशिक्षक सुरजित घोष यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

कल्याणी कोल्हापूर रग्बी असोसिएशन व शिवाजी विद्यापीठ रग्बी संघाची खेळाडू असून पाडळी खुर्द (ता. करवीर) येथील रहिवासी आहे. आई शेतमजुरी व वडील सिक्युरिटी गार्डचे काम करतात. कल्याणी सध्या न्यू कॉलेजमध्ये बी. ए.च्या तिसऱ्या वर्षात शिकत आहे.

तिला राष्ट्रीय व राज्य रग्बी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसह कोल्हापूर संघटनेचे पेट्रन इन चिफ मालोजीराजे, मधुरिमाराजे, जिल्हा क्रीडा अधिकारी डॉ. चंद्रशेखर साखरे, अध्यक्ष अमर सासणे, प्रशिक्षक दीपक पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ महिला संघ अ.भा. स्पर्धेसाठी पात्र

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या महिला क्रिकेट संघाने इंदोर विद्यापीठाचा ४३ धावांनी पराभव करून पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ महिला क्रिकेट स्पर्धेत मानांकन मिळवले. यामुळे हा संघ म्हैसूर येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी प्रथमच पात्र ठरला आहे.

कलिंगा युनिव्हर्सिटी, भुवनेश्वर येथे सुरू असलेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ महिला क्रिकेट स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर अंतिम चार संघांमध्ये दाखल झाला. स्पर्धेत सुरुवातीपासूनच बहारदार खेळ करणाऱ्या शिवाजी विद्यापीठाच्या संघाने बुधवारच्या सामन्यात २० षटकांत १४३ धावा केल्या. उत्तरादाखल इंदोर विद्यापीठाचा संघ १०० धावांत गुंडाळला. तत्पूर्वीच्या सामन्यात शिवाजी विद्यापीठ संघाने गुजरात टेक्नॉलॉजी विद्यापीठ, वीर वर्धमान विद्यापीठ गुजरात, सौराष्ट्र विद्यापीठ या संघांचा पराभव केला. संघाला डॉ. रोहित पाटील व प्रा. देवदत्त महात्मे यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

पुढारी

# मुंबई, परभणी, जळगाव, पुणे विजयी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी (बुधवार) मुंबई, पुणे, परभणी आणि जळगाव या विद्यापीठांनी आगेकूच केली.

**मुंबईचा १३२ धावांनी विजय**

मुंबई विद्यापीठाने १ बाद २०० धावा केल्या. अनिल घडसीने ९७, विपूल खंडारीने ६६ धावा केल्या. सोलापूरचा संघ ६८ धावांत गुंडाळला. मुंबईच्या प्रमोद म्हात्रेने ३ घेतल्या. सामनावीर अनिल घडसी ठरला.

**पुणे संघाचा ११ धावांनी विजय**

पुणे विद्यापीठाने २ बाद १५७ धावा केल्या. मनीष गायकवाडने ६३, नितीन प्रसादने ५३ धावा केल्या. नांदेडचा संघ १४६ धावांपर्यंत मजल मारू शकला. पुण्याच्या बसवंत गजवळने ४ विकेटस् घेतल्या. मनीष गायकवाड सामनावीर ठरला.

**जळगावचा ४ विकेटस्‌नी विजय**

नाशिकने १ बाद १३९ धावा केल्या. जळगांवच्या जितेंद्र पाटीलने ३ विकेटस् घेतल्या. जळगावने ६ बाद १४० धावांसह विजय साजरा केला. सामनावीर जितेंद्र पाटीलने ५७, रवींद्र गिरनारेने २६ धावा केल्या.

**परभणीचा ७ विकेटस्‌नी विजय**

नाशिक संघाने १९.५ षटकांत सर्वबाद ९८ धावा केल्या. परभणीने १२.१ षटकात ३ गड्यांच्या मोबदल्यात ९९ धावांसह विजय साजरा केला. धीरज पाथ्रीकरने नाबाद ५२ धावांसह सामनावीरचा किताब पटकाविला.

1 6 MAR 2023 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मुंबई, पुणे, परभणी, जळगाव संघांचे विजय

## आंतरविद्यापीठ कर्मचारी, कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी- २० क्रिकेट स्पर्धेमध्ये मुंबई, पुणे, परभणी आणि जळगाव या विद्यापीठांनी विजय प्राप्त केले. बुधवारी स्पर्धेचा तिसरा दिवस होता.

सकाळच्या सत्रातील पहिला सामना पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठ यांच्यात झाला. मुंबईने या सामन्यात तब्बल १३२ धावांनी विजय मिळवला. मुंबई विद्यापीठाने २० षटकात १ बाद २०० धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल खेळताना सोलापूरचा संघ १२.१ षटकात सर्व बाद ६८ धावाच करू शकला. मुंबईचे अनिल घडसी सामनावीर ठरले.



दुसरा सामना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि नांदेडचे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांच्यात झाला. हा सामना पुण्याने ११ धावांनी जिंकला.

प्रथम फलंदाजी करताना पुणे विद्यापीठाने २० षटकात २ बाद १५७ धावा केल्या. नांदेडचा संघ १९ षटकात सर्व बाद १४६ धावापर्यंतच पोहोचू शकला. मनीष गायकवाड सामनावीर ठरला.

दुपारच्या सत्रात नाशिकचे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ आणि जळगावचे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्यात सामना झाला. जळगावने हा सामना चार गडी राखून जिंकला. नाशिक संघाने २० षटकात १ बाद १३९ धावा केल्या. हे आव्हान जळगांव संघाने १७.१ षटकात ६ गड्यांच्या मोबदल्यात पार केले. जितेंद्र पाटील सामनावीर ठरला.

दुपारचा दुसरा सामना नाशिकचे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आणि परभणीचे वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ यांच्यात झाला. परभणीने हा सामना ७ गडी राखून जिंकला. नाशिकने १९.५ षटकात सर्व बाद ९८ धावा केल्या. परभणी संघाने हे आव्हान अवघ्या १२.१ षटकात ३ गड्यांच्या मोबदल्यात पार केले.

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा महिला क्रिकेट संघ म्हैसूर येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे.

# विद्यापीठाचा महिला क्रिकेट संघ अखिल भारतीय स्पर्धेसाठी पात्र

## पश्चिम विभागीय स्पर्धेत मानांकन

▶ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १५ : शिवाजी विद्यापीठाच्या महिला क्रिकेट खेळाडूंनी इंदूर विद्यापीठाचा ४३ धावांनी पराभव करून पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ महिला क्रिकेट स्पर्धेत मानांकन मिळविले. म्हैसूर येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी हा संघ पात्र ठरला आहे. या संघाला पहिल्यांदाच संधी मिळाली.

कलिंगा युनिव्हर्सिटी (भुवनेश्वर) येथे सुरू असलेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ महिला क्रिकेट स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संघाने धवल कामगिरी केली. या स्पर्धेत या संघाने इंदूरच्या देवी अहिल्या विद्यापीठाच्या संघास ४३ धावांनी पराभूत केले. प्रथम फलंदाजी करताना शिवाजी विद्यापीठाने २० षटकांत १४३ धावा केल्या. उत्तरदाखल फलंदाजीस उतरलेल्या इंदोर विद्यापीठाच्या संघाचा खेळ १०० धावांत आटोपला. गुजरात टेक्नॉलॉजी विद्यापीठ



संघास शिवाजी विद्यापीठ संघाने ४३ धावांत गुंडाळून केवळ दोन षटकांत लक्ष्य गाठले. त्यानंतरच्या सामन्यात वीर वर्धमान विद्यापीठ गुजरात संघाने १३९ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल शिवाजी विद्यापीठ संघाने हे लक्ष्य एक गडी गमावून पूर्ण केले. तिसऱ्या सामन्यात शिवाजी विद्यापीठ संघाने सौराष्ट्र विद्यापीठावर विजय मिळवला. सौराष्ट्र संघाने ६३ धावा केल्या. प्रत्युत्तरदाखल शिवाजी विद्यापीठाच्या संघाने नाबाद ६५ धावा करीत विजय मिळविला. या संघाचे व्यवस्थापक, मार्गदर्शक म्हणून डॉ. रोहित पाटील, प्रा. देवदत्त महात्मे कार्यरत आहेत.

तरूण भारत

# विद्यापीठाच्या पंचवार्षिक बृहत आराखड्यासाठी मागवल्या सूचना

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा २०२४-२५ ते २०२८-२९ मधील पंचवार्षिक बृहत आराखडा बनवण्याचे काम सुरू आहे. त्यासाठी कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यात आवश्यक त्या शैक्षणिक सुविधांसाठी सुचना मागवल्या आहेत. यासंदर्भात साताऱ्यात २० मार्च, कोल्हापुरात २१ मार्च आणि सांगलीत २३ मार्चला बैठका आयोजित केल्या आहेत. या बैठकांना उपस्थित राहण्याचे आवाहन विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

शिवाजी विद्यापीठ क्षेत्रात येत्या ५ वर्षांत आवश्यक प्रस्तावाचा आराखडा बनवण्याचे काम सुरू आहे. त्यासाठी कार्यक्षेत्रातील तीन जिल्ह्यात नवीन महाविद्यालये, विद्याशाखा, अभ्यास पाठ्यक्रमांची निश्चिती केली जाणार आहे. तसेच शैक्षणिक क्षेत्रासह अन्य क्षेत्रांतील विविध घटकांशी चर्चा केली जाणार आहे. त्यासाठी समित्या स्थापन केल्या आहेत. त्यानुसार सातारा येथील लालबहादूर शास्त्री महाविद्यालयात २० रोजी सकाळी ११ वाजता कोल्हापुरातील गोपालकृष्ण गोखले महाविद्यालयात २१ रोजी सकाळी ११ वाजता तर सांगली येथील मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालयात २३ रोजी सकाळी ११ वाजता बैठक होणार आहे.

प्रत्येक जिल्ह्यात आयोजित या

■ साताऱ्यात २०, कोल्हापुरात २१ आणि सांगलीत २३ रोजी बैठका



बैठकांना विद्यार्थी, पालक, शिक्षक, प्राचार्य, शैक्षणिक संस्था प्रतिनिधी, लोकप्रतिनिधी आणि अन्य घटकांनी उपस्थित राहावे. तसेच नवीन महाविद्यालये, विद्याशाखांसाठी स्थळ सुचवावे. याची माहिती समन्वयकांना द्यावी, आलेल्या सुचनांचा अभ्यास करून पंचवार्षिक बृहत आराखड्यात समावेश केला जाणार असल्याची माहिती कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी दिली आहे.

**प्रस्ताव सादर करावा**

महाविद्यालय, नवीन अभ्यासक्रम सुरू करायचे आहे, अशा संस्थांनी बैठकीच्या दिवशी संस्थेच्या लेटरपॅडवर व विद्यापीठाच्या विहित नमुण्यात प्रस्ताव सादर करावयाचा आहे. यासाठी नवीन शैक्षणिक धोरण २०२० च्या तरतुदींचा अभ्यास करून, अभ्यासक्रमाची मागणी करावी..हा आराखडा २०२४ ते २०२९ या पंचवार्शिक योजनेतील आहे.याची दखल संस्थापकांनी घ्यावी.

16 MAR 2023

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तिसऱ्या दिवशी मुंबई, पुणे, परभणी, जळगाव विजयी

## राज्य आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक क्रिकेट स्पर्धा : मुंबईचा १३२ धवांनी दणदणीत विजय

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत बुधवारी तिसऱ्या दिवशी झालेल्या साखळी सामन्यात मुंबई, पुणे, परभणी आणि जळगाव या विद्यापीठांनी प्रतिस्पर्धी संघावर विजय मिळवले. येथील शिवाजी विद्यापीठाच्या मैदानावर ही स्पर्धा सुरू आहे.



सकाळच्या सत्रात पहिला सामना पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठ यांच्यात झाला. मुंबईने हा सामना तब्बल १३२ धावांनी जिंकला. सोलापूरने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. फलंदाजीसाठी उतरलेल्या मुंबईने २० षटकात १ बाद २०० धावांचा डोंगर रचला. मुंबईकडून अनिल घडसी यांनी ९७, विपुल खंडारी यांनी ६६ धावांचे बहुमुल्य योगदान दिले. प्रत्युत्तरादाखल खेळताना २०० धावांचा पाठलाग करताना सोलापूरचा संघ अवघ्या १२.१ षटकात ६८ धावातच गुंडाळला. मुंबईच्या प्रमोद म्हात्रे यांनी ९ धावात ३, तर संजय भालेराव यांनी ४ धावात २ गडी बाद करून विजयात मोलाचा वाटा उचलला. मुंबईचे अनिल घडसी सामनावीर ठरले.

सकाळच्या सत्रातील झालेल्या दुसऱ्या सामन्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठावर ११ धावांनी निसटता विजय मिळवला. नांदेडने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना पुणे विद्यापीठाने २० षटकात २ बाद १५७ धावा केल्या. मनिष गायकवाड यांनी ६३, नितीन प्रसाद यांनी ५३ तर विनोद नरके यांनी नाबाद २५ धावांचे योगदान दिले. नांदेडच्या प्रसाद मुपडे व गोविंद सोनटाके यांनी प्रत्येकी १ बळी घेतले. १५७ धावांचे आव्हान घेऊन मैदानांत उतरलेल्या नांदेडचा संघ १९ षटकात सर्व बाद १४६ धावापर्यंतच पोहचू शकला. पुण्याच्या बसवंत गजवळ यांनी सर्वाधिक ४ तर विनोद नरके यांनी २ बळी घेतले. पुणेच्या मनिष गायकवाड यांना सामनावीर पुरस्काराने गौरविले.

दुपारच्या सत्रात नाशिकचे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ आणि जळगावचे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्यात पहिला सामना झाला. जळगावने हा सामना चार गडी राखून जिंकला. नाशिक संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी घेतली. त्यांनी २० षटकात १ बाद १३९ धावा केल्या. त्यांच्याकडून नंदकिशोर ठाकरे यांनी २३, राजेंद्र शहाणे यांनी १५, संदीप चौधरी यांनी १४ धावा केल्या. जळगांवच्या जितेंद्र पाटील यांनी ३२ धावात ३ गडी बाद केले. १३९ धावांचे हे आव्हान जळगांव संघाने १७.१ षटकात ६ गड्यांच्या मोबदल्यात पार केले. जितेंद्र पाटीलनी ५७, रवींद्र गिरनारे यांनी २६ धावा केल्या. जळगावच्या जितेंद्र पाटील यांना सामनावीर पुरस्काराने सन्मानित केले.

दुपारच्या सत्रातील दुसऱ्या सामन्यात नाशिकच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठवर परभणीच्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने ७ गडी राखून विजय मिळवला. नाशिकने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. नाशिकने १९.५ षटकात सर्व बाद ९८ धावापर्यंत मजल मारली. परभणीच्या मारूती शहाळे यांनी ३ तर मनोज कराळे यांनी २ गडी बाद केले. सोपे आव्हान घेऊन मैदानात उतरलेल्या परभणी संघाने अवघ्या १२.१ षटकात ३ गड्यांच्या मोबदल्यात पार केले. त्यांच्याकडून धीरज पाथ्रीकर यांनी नाबाद ५२ तर मनोज कराळे यांनी १८ धावा केल्या. धीरज पाथ्रीकर यांचा सामनावीर पुरस्काराने सन्मान करण्यात आला.